# छत्रपती शाहू महाराजांचे भटक्या विमुक्त समाजविषयक कार्य

**प्रा. श्रीमती संध्या जयसिंग माने,** राज्यशास्त्र विभाग, चंद्राबाई शांताप्पा शेंडूरे कॉलेज, हुपरी. ता. हातकणंगले जि. कोल्हापूर. महाराष्ट्र – 416203

---

**प्रस्तावना :-**

महाराष्ट्रातील कोल्हापूर संस्थानचे प्रागतिक अधिपती, थोर समाजसुधारक, स्त्री पुरुष समानतेचे पुरस्कर्ते, शिक्षणाला प्राधान्य देणारे, जातिभेद निर्मूलन आणि अस्पृश्यता निर्मूलनाचे कार्य करणारे कृतीशील समाजसुधारक तसेच बहुजनांच्या सामाजिक, राजकीय, शैक्षणिक व आर्थिक विकासासाठी प्रयत्न करणारे छत्रपती शाहू महाराज. विषमतापूर्ण भारतीय समाजव्यवस्थेच्या उतरंडीमध्ये भटक्या विमुक्त जमातींना कुठेच स्थान नव्हते. हजारो वर्षांपासून या जमातींची समाजव्यवस्थेशी असलेली नाळ तुटलेली होती. सामाजिक, सांस्कृतिक, आर्थिक, शैक्षणिकदृष्ट्या विकासापासून दूर असलेल्या या जमातींच्या प्रगतीसाठी, विकासासाठी शाहू महाराजांनी अथक प्रयत्न केलेले दिसून येतात. शाहू महाराजांनी केलेल्या याविषयीच्या कार्याचा अभ्यास संबंधित शोधनिबंधात करण्यात आला आहे.

**संशोधनाचे उद्दीष्टे :-**

1) छ. शाहू महाराजांचे स्त्रीया, बहुजन समाज विषयक कार्य अभ्यासणे.
2) भटक्या विमुक्त समाजाची ब्रिटीशकालीन स्थिती अभ्यासणे.
3) छ. शाहू महाराजांनी भटक्या विमुक्त समाजाविषयी कार्य अभ्यासणे.

**संशोधनाची साधने :-**

संबंधित शोधनिबंधाचा अभ्यास करताना दुय्यम साधनांचा उदा. ग्रंथ, संदर्भ पुस्तके, मासिके यांची मदत घेतली जाणार आहे.

**शोधनिबंधाची मांडणी :-**

**शाहू महाराजांचे स्त्रिया व बहुजन समाजविषयक कार्य :**

छत्रपती शाहू महाराजांचा कार्यकाळ 1874 ते 1922 दरम्यानचा. म्हणजे त्यांना 48 वर्षांचं जीवनमान लाभले. वयाच्या विसाव्या वर्षी म्हणजे 2 एप्रिल, 1894 रोजी त्यांनी कोल्हापूर संस्थानच्या राज्यकारभाराची सूत्रे हाती घेतली. छत्रपती शाहू महाराजांची सन 1894 ते 1922 पर्यंतची अवघी 28 वर्षांची कारकीर्द सर्वसामान्य जनतेच्या दृष्टीने अतिशय क्रांतिकारी व हितकारी ठरली. पुरोगामी विचार प्रत्यक्षात कायद्याद्वारे उतरवून प्रशासनामार्फत त्यांची स्वत: सहभागी होऊन पूर्तता करण्याची क्षमता छत्रपती शाहू महाराजांनी सिध्द केली होती. शाहू महाराजांनी सामाजिक, शैक्षणिक, आर्थिक सुधारणा व प्रगतीसाठी दिवसरात्र कार्य केले. शिक्षणाचे महत्त्व ओळखून प्रामुख्याने बहुजन समाजाला, स्त्रियांना शिकून शहाणे करण्यासाठी वेगवेगळे कायदे केले, त्यांची अंमलबजावणी तीव्रतेने केली. स्त्रियांच्या स्वातंत्र्य, समतेला महत्त्व देऊन विधवा पुनर्विवाह कायदा, विवाह नोंदणी कायदा, मिश्र वा आंतरजातीय विवाहाला पाठींबा देणारा कायदा, स्त्रियांचा छळ व घटस्फोट याविषयी स्त्रियांना संरक्षण देणारा कायदा, मागासलेल्या वर्गातील मुलींना व स्त्रियांना मोफत शिक्षण खर्चाची सोय, जोगिणी-देवदासी प्रथेचे निर्मूलन करण्यासाठी निर्णय अशा विविध कायद्याच्या सोयी सुविधांच्या माध्यमातून शाहू महाराजांनी स्त्री शिक्षणाला स्त्री संरक्षणाला प्राधान्य दिले, कारण महात्मा फुले यांच्या स्त्री शिक्षणाचे महत्त्व त्यांनी जाणले होते. याचबरोबर छत्रपती शाहू महाराजांनी बहुजन समाजाला विकसित करण्यासाठी अनेक प्रयत्न केलेले दिसतात. समाजातील प्रत्येक घटकास सक्तीचे मोफत प्राथमिक शिक्षण, इतकेच नव्हे तर विविध जातींच्या, धर्माच्या समाजातील विद्यार्थ्यांची शिक्षणाची सोय व्हावी म्हणून वसतीगृहाची व्यवस्था, आर्थिक मदत, अस्पृश्य मुलांना शैक्षणिक ठिकाणी समानतेची वागणूक देण्यासंदर्भातील राजाज्ञा, अशा अनेक कायद्याद्वार, आर्थिक मदतीद्वारे बहुजन समाजाला शिक्षित करून विकसित करण्यासाठी शाहू महाराजांनी कार्य केले. पुढे जाऊन शिक्षित झालेल्या या बहुजन समाजातील लोकांना आपल्या संस्थानात पन्नास टक्के राखीव जागा ठेवल्या होत्या. भारतातील 16 जुलै, 1902 चा हा राखीव जागा ठेवणारा पहिलाच कायदा होता. या हुकुमात शाहू महाराजांनी असे म्हटले आहे की, "संस्थानच्या नोकरीत मागासवर्गीयांचे प्रमाण कमी आहे, म्हणून ही परिस्थिती काही अंशी दूर करण्यासाठी व संस्थानमध्ये महाराजांच्या प्रजाजनांना उच्च शिक्षण संपादण्यास उत्तेजन देण्यासाठी या वर्गाकरीता आजपर्यंत प्रमाणापेक्षा विस्तृत प्रमाणात संस्थानच्या नोकरीत जागा राखून ठेवण्याचा महाराजांचा निर्णय कृत्निश्चय झाला आहे." स्त्री शिक्षण, बहुजनांचे शिक्षण यासाठी कार्यरत असणारी महात्मा फुले यांची सत्यशोधक

चळवळ आणि याच विचारांशी समरूप असलेले शाहू महाराजांचे कार्य हे समाज सर्वांगिण दृष्टीने प्रगतीशील करण्यासाठी महत्त्वाचे ठरते.

**भटक्या विमुक्तांची ब्रिटीशकालीन स्थिती :**

अर्थात स्त्रिया, बहुजन किंवा मागासलेल्या समाजापेक्षाही बिकट परिस्थिती होती ती समाजातील भटक्या विमुक्त लोकांची. पारंपारिक गावगाड्यातील उत्पादन प्रक्रियेमध्ये भटक्या-विमुक्त जमातींना सामावून घेतले गेले नाही. परिणामी हे घटक उदरनिर्वाहासाठी भटकू लागला. मात्र ब्रिटीशांच्या आगमनामुळे नैसर्गिक जंगल, जल संपत्तीवर आपली गुजराण करणाऱ्या या लोकांना इंग्रजी कायद्यामुळे उदरनिर्वाह मुश्किल होऊ लागला. ब्रिटीशकालीन अनेक औद्योगिक, दळणवळणाच्या प्रगतशील स्थित्यंतरामुळे या भटक्या विमुक्तांची अवस्था दयनीय झाली. ही लोक चोरी, गुन्हेगारी करून आपली पोटे भरु लागली होती. 1857 च्या बंडा अगोदर कोळी, भिल्ल, रामोशी यांनी इंग्रजांविरुध्द जोरदार विरोध केले होते. या सर्व जमातींचा बंदोबस्त केल्याशिवाय भारतीय उपखंडात शांतता प्रस्थापित होणार नाही व आपली सत्ता स्थिर होणार नाही हे ओळखून ब्रिटीश सरकारने 1871 साली 'गुन्हेगारी जमात कायदा' तयार केला आणि या भटक्या जाती-जमातींना तीन तारेच्या कुंपणात बंदिस्त केले. त्यांच्या स्वातंत्र्यावर बंदी आली. त्यांना पोलीस ठाण्यात हजेरी लावण्यात आली. गावाबाहेर कुठेही जाण्यास बंदी करण्यात आली. एकूणच भटक्या विमुक्त जातीत जन्माला येणारे मूल हे गुन्हा करत नसेल तरी त्यांच्याकडे गुन्हेगार म्हणूनच पाहिलं जात असे. एकूणच लूटमार, घरफोडी, चोरी, दरोडे, वाटमारी हे भारतीय समाजाचे जातीनिहाय व्यवसाय नव्हते; परंतु ब्रिटीशांनी या जमातींना गुन्हेगारी जमात म्हणून नोंदणी करून त्यांच्यावर कायद्यानेच गुन्हेगारी शिक्का बसविला.

**छत्रपती शाहू महाराजांचे भटक्या विमुक्त समाजविषयक कार्य :**

मुंबई प्रांतात कैकाडी, बेस्तर, पारधी, कंजारभाट, बंजारा, वडार, टकारी, रामोशी, छप्परबंद, मांगगारुडी, रजपूत, भामटा या जमाती कोल्हापूर संस्थानात राहत होत्या. परंतु कोल्हापूर संस्थानात छत्रपती शाहू महाराजांनी या गुन्हेगारी भटक्या जमातीला सुधारण्याची संधी दिली. महाराजांनी या भटक्या जातींना जागा देवून एका ठिकाणी स्थिर केले. शिक्षा करण्याऐवजी त्याच्या जीवनात परिवर्तन करण्याचा मार्ग स्वीकारला. कोणीही व्यक्ती जन्मजात गुन्हेगार नसते, ही मानसिकता ओळखून त्यांनी या समाजाला गुन्हेगारी मार्गापासून दुर नेऊन चांगल्या मार्गाला लावण्याचा प्रयत्न केला. कोल्हापूरातील फासेपारधी जमातीला रोजगार उपलब्ध करून दिला. त्यांना पहारेकरी म्हणून महाराजांनी नेमणूका दिल्या, सोनतळी कॅम्पमधील घरांची, रस्त्यांची कामे यावर पारध्यांची नेमणूक केली. काही पारध्यांना राधानगरी धरणाच्या कामावर पाठविले. फासेपारधी कुटुंबाला कोल्हापूरातील कोटीतीर्थाच्या माळावर जागा दिली. बांधकामासाठी आर्थिक मदत केली. आज रजपूतवाडी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या कोल्हापूरातील या परिसरात पूर्वी रजपूत भामटा जमातीच्या लोकांना जागा देऊन त्यांचे पूनर्वसन महाराजांनी केलेले दिसते. वडार समाजाला ही अशीच जागा देऊन त्यांचा विकास घडवून आणला. इतकेच नव्हे तर पारधी, कोरवी या जमातीमधील अनेक तरुणांना खाऊ खुराक देऊन महाराजांनी त्यांना कुस्तिगीर बनविले. पारध्याच्या मुलांना सोनतळीवर शाळेत दाखल केले. त्यांच्या शिक्षणाची व्यवस्था केली. रामोशी, बेरड समाजातील लोकांना रायबाग, गोकाक, कंकणवाडी परिसरात शेतीसाठी जमिनी देऊन त्यांना उत्कृष्ठ शेतकरी बनविले. अशा पध्दतीने शाहू महाराजांनी गुन्हेगार समजल्या जाणाऱ्या या जमातींवर विश्वास दाखवून त्यांना कष्टाची कामे देवून सन्मानाचे जीवन प्रदान केले.

**हजेरी पध्दती बंद :-**

महार, मांग, रामोशी, बेरड, गट्टेचोर व कोळी इ. जमातींना ब्रिटीश सरकारने गुन्हेगार जमाती ठरवून त्यांच्यावर दररोज पोलीस ठाण्यावर हजेरी देण्याचे बंधन घालण्यात आले होते. ही हजेरी पध्दती माणुसकीवर ठपका होती. विसाव्या शतकातील ही गुलामगिरीची पध्दती नष्ट करण्याचा निर्णय छत्रपती शाहू महाराजांनी घेतला. गुन्हेगार समजल्या गेलेल्या चार जातींची हजेरी माफ करणारा हुकुम शाहू महाराजांचा दि. 27 जुलै, 1918 रोजी काढला होता. तो पुढीलप्रमाणे :-

"इलाखे मजकुरी गुन्हेगार जातींच्या लोकांच्या हजेरी दररोज पोलीस पाटलांकडे होते. त्यातील काही जातींची हजेरी माफ केली असून काही काही ठिकाणी त्यांची हजेरी अद्याप घेण्यात येते. या हजेरीपासून त्या-त्या जातीच्या लोकांची फार गैरसोय होते व दूमानाचे धंदे करून पोट भरण्यास अडचण पडते. ही सर्व अडचण दूर झाली पाहीजे, यासाठी हुकुम देण्यात येतो की, महार, मांग, रामोशी व बेरड या चार जातींच्या लोकांची हजेरी बंद करण्यात यावी. यातील जे कोणी गुन्ह्यात सापडून शिक्षा झालेली असतील त्यांना मात्र या हुकुमाने हजेरीची माफी नाही. या हुकुमांचा अंमल ताबडतोब करण्यात यावा", अशी श्रीमन्महाराज छत्रपतिसाहेब सरकार करवीर यांचे हुजुरुन आज्ञा झाली आहे. त्याप्रमाणे तजवीज ठेवावी.

अशाच पध्दतीने 29 सप्टेंबर 1918 रोजी असाच दुसरा आदेश काढून गट्टेचार जातीची हजेरी माफ केली. 22 फेब्रुवारी, 1918 रोजी महाराजांनी बलुतेदारी पध्दती कायद्याने बंद केली. हजेरीबंदीचा छत्रपती शाहू महाराजांनी काढलेला हा एकप्रकारे स्वातंत्र्याचा, मानवमुक्तीचाच आदेश होता. ब्रिटीश शासनाचे शासन असूनसुध्दा राजर्षी शाहू महाराजांनी हा अमानवी कायदा आपल्या संस्थानात राबविण्यास नकार दिला. त्यांना या गुन्हेगारी जमातींना आपल्या दरबारात विविध विभागामध्ये काम करण्याची संधी दिली. त्यांची पत, प्रतिष्ठा वाढविली. या जमातींनाही राजांनी दाखविलेला विश्वास सार्थ ठरविला. इमान-इतबारे महाराजांच्या संस्थानात सेवा केली. हजेरी माफीचे परिणाम महाराजांनी सांगितले आहेत, "गुन्ह्याचे मान पाहिले तर मी स्वत:च्या अनुभवावरून असे सांगू शकतो की, हजेरीच्या लोकांपेक्षा बिनहजेरीच्या लोकांतच गुन्हेगारीची संख्या जास्त आहे. आणि मी हजेरी पध्दती बंद केल्यापासून गुन्ह्यांची संख्या कमी झाली आहे. कारण प्रत्येकास अब्रुने जगावे असे वाटते." मानवतेचा संदेश, मानवतेवर विश्वास छत्रपती शाहू महाराजांनी त्यांच्या कृतीतून सिध्द केला आणि या गुन्हेगार जमातीतील लोकांनीही प्रामाणिकपणे दिलेल्या कामास न्याय देऊन महाराजांचा विश्वास सार्थ ठरविला. एकूणच महाराजांचे हे गुन्हेगार समजल्या गेलेल्या भटक्या विमुक्त समाजासाठी केलेले कार्य अनमोल असे आहे.

**समारोप :-**

छत्रपती शाहू महाराजांचे कार्य अनन्यसाधारण आहे. छत्रपती शाहू महाराजांनी समाजातील मागासलेल्या, दुर्लक्षित घटकांचा सर्वांगिण विकास करण्यासाठी आपल्या संस्थानात विविध कायदे, सोयी-सुविधा निर्माण केल्या. त्यांची प्रत्यक्षात अंमलबजावणी केली. किंबहुना स्वत: अंमलबजावणीबाबत ते काटेकोर लक्ष घालत. मणभर विचारापेक्षा कणभर कृती श्रेष्ठ ठरते, या उक्तीप्रमाणे त्यांनी विचार व कृती यावर भर दिला. आज गुन्हेगार जमात कायदा अस्तित्वात नाही. मात्र या जाती-जमातीकडे गुन्हेगार म्हणून बघण्याची सामाजिक मानसिकता आजही बदलली नाही. ती बदलणे गरजेची आहे. यासाठी महात्मा फुले, शाहू महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार समाजाच्या प्रत्येक घटकात रुजणे आवश्यक आहे.

**संदर्भ पुस्तके :-**

1) संपादक प्रा. डॉ. जाधव रमेश, राजर्षी शाहू गौरव ग्रंथ महाराष्ट्र शासन, राजर्षी शाहू चरित्र साधने प्रकाशन समिती मंत्रालय, मुंबई 400 021.

2) डॉ. पाटील टी. एस., 'राजर्षी शाहू छत्रपती', श्रमिक प्रतिष्ठान, कोल्हापूर, सप्टेंबर 2012.

3) कॉ. पानसरे, 'राजर्षी शाहू वसा आणि वारसा', नाग-नालंदा प्रकाशन, सांगली 2007.

4) डॉ. पवार जयसिंगराव भाऊसाहेब, 'राजर्षी शाहू छत्रपती', सुमेरु प्रकाशन, डोंबिवली (पूर्व), द्वितीयावृत्ती – फेब्रुवारी 2010.